MHBI030029642022

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.९६१/२०२२
शेख अबुबकर वि. ग्रामविकास अधिकारी
(CNRNo.MHBI030029642022)

:: निशाणी क्र.१ वरील आदेश ::

सदरचा अर्ज जन्म-मृत्यु नोंदणी कायदा, १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे अर्जदाराच्या जन्माची नोंद होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदाराचा जन्म दिनांक ०२-०१-१९९५ रोजी नेकनुर, ता.जी.बीड येथे राहते घरी येथे राहते घरी झालेला आहे. परंतु, अर्जदाराचा जन्म राहते घरी झालेला असल्याने जन्माची नोंद राहुन गेलेली आहे. अर्जदाराच्या जन्म नोंद प्रमाणपत्राची शासकिय व निमशाकीय कामासाठी गरज भासली आहे. सबब, सदरचा अर्ज दाखल केला.

३. सदर अर्ज दाखल झल्यानंतर गैरअर्जदारास नोटीस पाठविण्यात आली होती. सदर नोटीस (निशाणी क्र.६) गैरअर्जदाराला दिनांक २१-१०-२०२२ रोजी तामील होवुन देखील गैरअर्जदार सदर प्रकरणात हजर झाले नाहीत.

४. अर्जदारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने अर्जाच्या अनुषंगाने स्वतःचे शपथपत्र निशाणी क्र.१०, ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय, नेकनुर ता.जि.बीड यांनी दिलेले जन्म/मृत्यु नोंद अनउपबधता प्रमाणपत्र निशाणी क्र.५, अर्जदाराचे स्वतःचे आधार कार्डची पडताळणी प्रत, माध्यामिक शालान्त प्रमाणपत्राची पडताळणी प्रत व आयकर कार्डची पडताळणी प्रत दाखल केलेल्या आहेत.

५. कलम १३(३) नुसार जन्माच्या किंवा मृत्युचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करुन पाहिल्यानंतर तशी नोंद करता येते. अर्जदाराने दाखल केलेले कागदपत्रे व पुराव्याचे अवलोकन केले असता, अर्जदाराचा जन्म दिनांक ०२-०१-१९९५ रोजी झाल्याचे दिसुन येते. तसेच ग्राम पंचायत कार्यालय, नेकनुर यांनी दिलेल्या जन्म/मृत्यु नोंद अनउपलब्धता प्रमाणपत्रानुसार अर्जदाराचे जन्माची नोंद ग्राम पंचायत कार्यालय, नेकनुर येथील नोंदणी

अभिलेखामध्ये शोध घेतला असता अभिलेखामध्ये त्यांच्या जन्माची नोंद आढळुन आली नाही. एवढेच नसुन दिनांक २२-१०-२०२२ रोजी दैनिक सिटीझन या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. परंतु मुदतीत कोणाचाही आक्षेप आला नाही.

६. वरील सर्व परिस्थितीचा व कागदपत्रांचा विचार करता, अर्जदार याचे तोंडी पुराव्यास कागदपत्राने पुष्टी दिलेली आहे. त्यानुसार, अर्जदार नामे शेख अबुबकर पि. शेख मिनहाजोद्दीन यांच्या जन्माची नोंद होणे आवश्यक आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

:: आ दे श ::

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. ग्रामविकास अधिकारी तथा संबंधीत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय, नेकनुर ता.जि.बीड यांनी अर्जदार नामे शेख अबुबकर पि. शेख मिनहाजोद्दीन यांच्या जन्मांची नोंद करावी.

३. अर्जदाराने कायदयाप्रमाणे दंड फी भरावी.

दिनांक : २४.११.२०२२
ठिकाण : बीड

(श्रीमती एस.एम.जोशी)
७वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बीड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 24.11.2022 |
| Transcribed on | : | 24.11.2022 |
| Checked and Singed on | : | 24.11.2022 |

Sd/-
M.A.Kulkarni,
Stenographer Grage-III